# श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी. (रजि.क्र.ए-७०८)

## श्री क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे.

जावक क्र. २४८२/२०२६ दि. ०७/०२/२०२६

# जाहीर निविदा

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी न्यासातर्फे खालीलप्रमाणे जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत :

१) श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या महत्त्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्ती तसेच देणगीदारांना श्रींची ९ x १३ आकाराची प्रतिमा भेट देणेसाठी १००० नग पुरविणे. (प्रत्यक्ष चौकशी/माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

२) न्यासाच्या विविध कार्यालयीन कामांकरिता विविध ठिकाणी ये-जा करणेकामी 'महिंद्रा स्कॉर्पिओ' कंपनीचे चारचाकी वाहन पुरविणे. (प्रत्यक्ष चौकशी/माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

३) श्री मार्तंड देवसंस्थान संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर डायलेसिस व डायग्नोस्टिक सेंटर येथे सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, अत्याधुनिक स्क्रीन पुरविणे/बसवून देणे व दोन कॉम्प्युटर सेट पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

४) श्री खंडोबा मंदिर गडकोट महाद्वार कमानीमधील देवळींमध्ये श्री खंडेरायाचे कुलधर्म-कुलाचाराकरिता वापरल्या जाणाऱ्या वस्तू तयार करून बसविणे. (प्रत्यक्ष चौकशी/माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

५) राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या महाद्वार पायरी मार्गावरील पूर्णाकृती पुतळ्याची डागडुजी-दुरुस्ती करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून व माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

६) छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त श्री खंडोबा मंदिरामध्ये मर्दानी खेळ प्रात्यक्षिक सादर करणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

७) छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मुख्य गाभारा व समूह शिल्प या ठिकाणी आकर्षक फुलांची सजावट करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून व माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

८) छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त समूह शिल्प या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करणे, मंडप व्यवस्था करणे व साउंड सिस्टीम पुरविणे. (प्रत्यक्ष पाहणी करून व माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

**टीप :** उपरोक्त कामांबाबत ऐच्छिक देणगीदार असल्यास कृपया श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा. (मो.क्र. ९३७०४५९४३३/९७६३०४४०१७)

**नियम व अटी**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२. निविदा भरणेकामी **फॉर्म फी रु. ५००/-** देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.

३. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा **दि. ०८/०२/२०२६ ते दि. १२/०२/२०२६ पर्यंत स.१० ते सायं.५ या वेळेत** खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ ई. निविदाधारकास कळविण्यात येईल.

५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ www.khandoba.com येथे उपलब्ध आहे.

६. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**निविदा जमा करण्याचे ठिकाण**

**श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी**

**मल्हार भक्तनिवास (दुर्गामाता चौक) जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे**

**आशिष मारुती बाठे**
**व्यवस्थापक**
**श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी.**

**मंगेश अशोक घोणे**
**अध्यक्ष**
**श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी.**

(पा.क्र. २६०२१७४८५०)